प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नागाळा पार्क, कोल्हापूर.
आस्थापना शाखा

| | |
|---|---|
| फोन नं. (०२३१) २६५४६५५<br>फॅक्स नंबर- (०२३१) २६५५५९८<br>Email-coprykop@gmail.com | जा.क्रं.कोजिप/शिक्षण/प्राथ/चशि -१७/१४६३ /१४<br>शिक्षण विभाग (प्राथमिक) जि.प.कोल्हापूर.<br>दिनांक :-१०/६/२०१४ |


नमुना - २

प्रति ,
मा.अध्यक्ष /सचिव
हॉलीवूड ॲकॅडमी कोल्हापूर ता.पन्हाळा

विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ यांच्या नियम ११,पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत...

आपल्या दिनांक - / /२०१३ च्या अर्जाचा संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार /शाळेची केलेली तपासणी याआधारे मी शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प.कोल्हापूर दिनांक **सन-२०१३/१४ पासून** दिनांक **सन- २०१५/१६** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता **१ ली ते १० वी** करिता संजीवन पब्लीक स्कूल पन्हाळा ता. पन्हाळा इंग्रजी माध्यम (का.विना.अनुदानित) या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे:-**

१. मान्येताचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल .
२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ (जोडपत्र एक ) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम ,२०११ (जोडपत्र दोन ) मधील तरतुदीचे शाळा पालन करीन .
३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना,पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत देईन आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईन परंतु आणखी असे की ,पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील प्रमाणकाचे अनूपालन करण्यात येईल .
४. परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमांच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल .अशी परिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बॅंक खाते देण्यात येईल .
५. संस्था /शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्यांच्या किंवा तिच्या माता पित्यास पालकास भाग पाडणार नाही .
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म, जात किंवा वंश ,जन्मठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव ,शाळामध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
७. A शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.
B कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
C कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
D प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकांस ,नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल .
E विकलांग/विशष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतूदीनुसार समावेश करण्यात येईल
F अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल.परंतू आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.
Gअधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची / तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील.
H शिक्षकाने /शिक्षकेने खाजगी शिकवणी कामात स्वत गुंतवून घेऊ नये, यांची सूनिश्चिती शाळा करील.

SANJEEVAN PUBLIC SCHOOL
CBSE
Affiliation No.
1130172
PANHALA, DIST.:KOLHAPUR

८. शाळा समूचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार कलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.
९. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.मागील तपासणीच्या वेळी शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे होत्या.

A शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ - ३७१७ sq m
B एकूण बांधकाम क्षेत्रफळ - ३७१७ sq m
C खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ - २०२३४ sq m
D वर्गखोल्यांची संख्या - १५
E कार्यालय-नि- भांडार- नि- मुख्याध्यापकांची खोली- आहे
F मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगह - जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनग्रह स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेलस.
G पिण्याच्या पाण्याची सुविधा- आहे
H दपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर-आहे
I अध्यापकन अध्ययन साहित्या/खेळ व क्रीडाविषयक सामग्री ग्रंथालय यांची उपलब्धता
J वाचन साहित्य विनासायास उपलब्ध

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र , चालविता येणार नाहीत.
१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
१३. शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६०२ (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंधाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्यासाठी किंवा कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.
१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.
१६. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक - २७३४०२०२७०४ या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.
१७. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थनिक प्राधिकरण देईल. अशा सूचनांचे पालन करावे.
१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.
१९. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद कोल्हापूर.

प्रत,
१. मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग कोल्हापूर.
२. गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती, ता. पन्हाळा
३. मुख्याध्यापक, संजीवन पब्लीक स्कूल पन्हाळा ता. पन्हाळा

SANJEEVAN PUBLIC SCHOOL
CBSE
Affiliation No.
1130172
PANHALA, DIST.:KOLHAPUR

TRUE COPY

Principal
Sanjeevan Public School
Somwar Peth, Panhala
Dist. : Kolhapur.-41620